# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, कृषि संशोधन केंद्र, सिंदेवाही- ४४१ २२२

## कृषि हवामान सल्ला पत्रक

## चंद्रपूर जिल्हा

क्र.कृ.ह.स./९४/कृ.सं.के./७३७/२०२० — दिनांक २४ नोव्हेंबर २०२०

| सिंदेवाही येथील मागील आठवड्यातील हवामान स्थिती दिनांक १७ ते २३ नोव्हेंबर २०२० | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसाचा हवामान अंदाज दिनांक २५ ते २९ नोव्हेंबर २०२० | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७/११ | १८/११ | १९/११ | २०/११ | २१/११ | २२/११ | २३/११ | दिनांक | २५/११ | २६/११ | २७/११ | २८/११ | २९/११ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | १ | ८ | १ | ० |
| ३३.० | ३२.८ | ३२.० | ३१.५ | ३०.० | २९.० | ३०.० | कमाल तापमान (अं.से.) | ३४ | ३४ | ३१ | ३२ | ३१.४ |
| १३.० | १३.० | १२.५ | १५.५ | १५.० | ७.५ | ५.० | किमान तापमान (अं.से.) | १७ | १८.३ | १६.७ | १६.३ | १५.२ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | अंशतः ढगाळ | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | ढग स्थिती (आकाश) | आंशिक ढगाळ | अंशतः ढगाळ | ढगाळ | अंशतः ढगाळ | आंशिक ढगाळ |
| ८३ | ९१ | ८२ | ८३ | ८८ | ८६ | ८९ | सकाळची सापेक्ष आद्रता (%) | ७५ | ७८ | ९३ | ९४ | ८४ |
| ५० | ३९ | ६० | ५७ | ६१ | ४३ | ३५ | दुपारची सापेक्ष आद्रता (%) | ४५ | ४८ | ६५ | ६० | ५३ |
| १.९ | १.८ | ३.३ | ४.० | २.२ | १.७ | १.८ | वा-याचा वेग (किमी/तास) | २ | २ | २ | २ | २ |

| पाऊस (मिमी) मागील आठवड्यातील | पाऊस (मिमी) ०१/०१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) ०१/०६/२०२० पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ०.० (०) | १२६६.४ (७०) | १०१५.० (५३) |

| हवामान अंदाज | पुढील पाच दिवसात दिनांक २५ ते २९ नोव्हेंबर २०२० रोजी चंद्रपूर जिल्हयात आंशिक ढगाळ ते अंशतः ढगाळ हवामान राहून दिनांक २६ व २७ नोव्हेंबर रोजी तुरळक ठिकाणी विजांचाकडकडाट, मेघगर्जनेसह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे तसेच दिनांक २८ नोव्हेंबर रोजी तुरळक ठिकाणी खूप हलका पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. |
|---|---|

| पिकांचे नाव | पिकाची अवस्था | शेतकऱ्यांना हवामान आधारीत कृषी सल्ला |
|---|---|---|
| सामान्य सल्ला | | ➢ चंद्रपूर जिल्हयात दि. २६ ते २८ नोव्हेंबर, २०२० रोजी तुरळक ठिकाणी खूप हलका ते हलका स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे तरी शेतकऱ्यांना सावध राहून कापणी झालेले धान मळणी करून सुरक्षित ठिकाणी ठेवावे.<br>➢ खरीप पिकाची कापणी झाल्यानंतर कमीत कमी मशागत परिस्थितीत रब्बी पिकांसाठी शेत किंवा शेतबांध्या तयार करावे.<br>➢ बियाण्यास पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी. |
| गहु | पेरणी | ➢ बागायती उशिरा पेरणीसाठी पूर्णा, पीडीकेव्ही सरदार, एकेएडब्लू ४६२७ या वाणांचे हेक्टरी १२५ ते १५० किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे. पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम किंवा व्हिटावाक्स ७५ टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी २.५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास या बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया केल्यानंतर त्या बियाण्यास अझाटोबॅक्टर २५० ग्रॅम व स्फुरद विरघडणारे जिवाणू खत (पि. एस. बी.) २५० ग्रॅम प्रती १० किलो बियाणे याप्रमाणे या जिवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. पेरणीच्या वेळी बियाणे ५ सें. मी. पेक्षा खोल पडणार नाही याची काळजी घावी. पेरणीसाठी दोन ओळीतील अंतर १५ ते १८ सें.मी. ठेवावे. पेरणीच्या वेळी नत्र स्फुरद पालाश ४० किलो प्रति हेक्टरी द्यावे. |
| हरभरा | पेरणी | ➢ ओलिताखालील हरभरा पेरणीसाठी प्रति हेक्टरी हिरवा चाफा व विजय (५० किलो), पीडीकेव्ही कांचन (६० किलो), जाकी ९२१८( ७५ किलो) या वाणांचे बियाणे वापरावे. पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करावी. त्यानंतर अनुक्रमे ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम + स्फुरद विरघडणारे जिवाणू खत (पि. एस. बी. ) २५ ग्रॅम + रायझोबीयम २५ ग्रॅम याप्रमाणात या जिवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. पेरणीच्या वेळी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद प्रति हेक्टरी द्यावे. |
| जवस | पेरणी | ➢ बागायती पेरणीसाठी २५ किलो प्रति हेक्टरी बियाणे एनएल ९७ किंवा पिकेव्ही एनएल २६० वाणांचा वापर करावा. बागायती पिकास ३०:३०:०० किलो नत्र / स्फुरद प्रति हेक्टरी द्यावे. पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करावी. |
| मोहरी | पेरणी | ➢ मोहरी पेरणीसाठी ५ किलो प्रति हेक्टरी बियाणे शताब्दी (एसीएन-९) किंवा एनआरसीएचबी-१०१ या वाणांचा वापर करावा. ओलिताची सोय असल्यास पिकास ५०:४०:०० किलो नत्र / स्फुरद प्रति हेक्टरी रासायनिक खते द्यावे. पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करावी. |
| धान | लोंबी पक्क्वता | ➢ धान पिकाची कापणी जमिनीलगत करावी. तसेच कापलेले पिक उन्हात वाळवल्यानंतर मळणी करून बियाणे सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.<br>➢ किफायतशीर कापणी व मळणीसाठी स्थानिक उपलब्ध असलेल्या यंत्राचा वापर करावा. |
| तूर | फुले व शेंगा अवस्था | ➢ शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी पिक ५० टक्के फुलावर आल्याबरोबर पहिली फवारणी क्विनॉलफॉस २५ टक्के इसी १६ मि.ली. त्यानंतर १५ दिवसांनी दुसरी फवारणी इमामेक्टिन बेन्झोएट ५ टक्के एसजी ३ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |

| | | |
|---|---|---|
| कापूस | बोन्डे भरणे अवस्था | ➢ वेळेवर पेरणी केलेल्या कपाशीचे फुटलेले बोन्डे असेल तर त्वरित प्रतवार व वाण प्रत कापूस वेचणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.<br>➢ शेंदरी बोडअळीच्या निरीक्षणासाठी प्रति हेक्टरी ८ कामगंध सापळे लावावेत. या सापळ्यामधील अडकलेल्या नरपतंग वेळो वेळी काढून नष्ट करावे तसेच दर २१ दिवसानंतर वड्या (ल्युर) बदलत राहावे.<br>➢ गुलाबी बोडअळी व पांढऱ्या माशीच्या एकत्रित नियंत्रणासाठी क्लोरोपायरीफॉस ५० टक्के प्रवाही + सायपरमेथ्रीन ५ टक्के इसी २० मि. ली. किंवा डेल्टामेथ्रीन १ टक्के ट्रायझोफोस ३५ टक्के इसी १६.६ मि. ली. इडोझाकार्ब १४.५ टक्के + असीटामिप्रीड ७.५ टक्के एससी ८ प्रती १० लिटर पाण्यातून फक्त एकदाच फवारावे.<br>➢ पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी बुफ्रोफेजीन २५ टक्के २० मि.ली. किंवा थायक्लोंप्रीड २१.७ एससी १० मि.ली. किंवा प्रोफेनाफॉस ५० टक्के प्रवाही २० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| मिरची | फुल ते फळ | ➢ चुरडा मुरडा रोगाच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० ईसी १४ मिली किंवा फिप्रोनील ५ एससी २० मिली किंवा इथीओन ५० ईसी ४० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| वांगे | फुल ते फळ | ➢ फळ पोखरणारी अळीचा प्रादुर्भाव आढळताच प्रादुर्भाव ग्रस्त फळे नियमित गोळा करून नष्ट कराव्यात तसेच नियंत्रणासाठी क्लोरनट्रानिप्रोल १८.५ एस.सी. ४ मि.ली. किंवा ट्रायझोफॉस ४० टक्के १२.५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| भाजीपाला पिके | पेरणी ते लागवड | ➢ मेथी, पालक, कोथिंबीर, मुळा व गाजर पिकाची टप्प्या टप्प्याने लागवड करावी.<br>➢ रोपवाटिकेतील वांगी,टोमॅटो,फुलकोबी व पानकोबीचे ४-६ आठवडे वयाचे रोपांची शेतात पुनर्लागवड करावी. |
| पशुपालन सल्ला | | ➢ रब्बी हंगामात घेणा-या मका, ओट, बरशीम लसूनघास व ज्वारी चारा पिकाची लागवड करावी.<br>➢ जनावरांना स्वच्छ पाणी पाजावे.<br>➢ गाई, म्हशी व बैल यांना पायखुरी व तोंडखुरी (एफ.एम.डी) रोगाच्या संरक्षणासाठी लसीकरण करून घावे. |

➢ टिप : रासायनिक तननाशक व किटकनाशकाची फवारणी करताना संरक्षक कीटचा वापर अवश्य करावा.

शेतकरी बंधुनो सप्रेम नमस्कार, वर्ष २०२० मधील ग्रामीण कृषि मौसम सेवा सल्ला पत्रक नोंदणीसाठी आपले नाव, गाव,पत्ता, मोबाईल नंबर इत्यादी माहिती ई-मेल aassindewahi@gmail.com किवा मोबाईल नंबर ९६२३३६०३२७ वर संपर्क साधावा.

प्रकल्प समन्वयक
ग्रामीण कृषि मौसम सेवा, कृषि संशोधन केंद्र,
सिंदेवाही जि. चंद्रपूर